जलयुक्त शिवार अभियान गाव कृती
आराखड्यास मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : जलशि-२०१६/प्र.क्र.५७४/जल-७**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख : २६ ऑक्टोबर, २०१६

वाचा:-

ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय

१) क्रमांक: जलसं-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ दि. ५ डिसेंबर, २०१४
दि. ०३ मार्च, २०१५ व दि. १ मार्च, २०१६

२) क्रमांक: जल अ-२०१४/प्र.क्र. २०३/जल-७ दि. २८ जानेवारी २०१५

**शासन परिपत्रक**

सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र-२०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राज्यात संदर्भाधीन दिनांक ५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे.

जलयुक्त शिवार अभियानाचा शासन निर्णयामध्ये आवश्यक वेळी नवीन बाबी तसेच सुधारणा संदर्भाधीन शासन निर्णयान्वये करण्यात आलेल्या आहेत.

जलयुक्त शिवार अभियानाच्या दि. ५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयानुसार गाव आराखडा तयार करुन ग्रामसभेची मान्यता घेण्यात येते व तद्नंतर तालुक्यातील गावांचे आराखडा एकत्रित करुन तालुका आराखडा व तालुक्याचा आराखडा एकत्रित करुन जिल्हा आराखडा तयार करण्यात येतो. गाव पातळीवरील आराखडा करणेसाठी संबंधित विभागाचे ग्राम पातळीवरील अधिकारी शिवार भेट करून गाव आराखडा तयार करतात व त्यास ग्रामसभेची मान्यता घेतात. तालुक्यातील सर्व गावांचे गाव आराखडे तालुका पातळीवर एकत्रित करण्यात येतात.

सन २०१७-१८ पासून निवडण्यात आलेल्या गावांना व त्या गावांच्या कृती आराखडयांना दि. १ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या तालुकास्तरीय आढावा व समन्वय समितीची मान्यता घेण्यात यावी. तद्नंतर आराखडे जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेण्यास सादर करण्यात यावेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०२६१६०२५५६९२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Narayan Karad

Digitally signed by Narayan Karad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ae7faeabaf4571c2748e4dd5ffd2cd108de0e130859970f4d7d0ee40046b3e9e, cn=Narayan Karad
Date: 2016.10.26 16:07:04 +05'30'

(ना.श्री.कराड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा.विरोधी पक्षनेता ,विधानसभा /विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
४. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य
५. मा सभापती विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंड्ळ सचिवालय यांचे सचिव
६. मा अध्यक्ष विधान सभा, महाराष्ट्र विधानमंड्ळ सचिवालय यांचे सचिव
७. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
८. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
९. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१०.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव , मंत्रालय, मुंबई.
११.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
१२.मुख्य अभियंता,लघुसिंचन (जलसंधारण) महाराष्ट्र राज्य ,पुणे
१३.मुख्य अभियंता वि.स.सि.वि. का. नागपूर
१४.सर्व विभागीय आयुक्त
१५.संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे
१६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क ,मुंबई प्रसिध्दीकरीता
१७. सर्व जिल्हाधिकारी,
१८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ,
१९.महालेखापाल ½ ,महाराष्ट्र राज्य , मुंबई /नागपूर लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता
२०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२१.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
२२.सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२३.सर्व अधिक्षक अभियंता, लघु सिंचन जलसंधारण मंडळ ,

२४.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२५.सर्व कार्यकारी अभियंता, (लघु सिंचन) जलसंधारण
२६.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२७.सर्व मंत्रालयीन विभाग
२८.सर्व सह सचिव /उप सचिव / अवर सचिव /कार्यासन अधिकारी, ग्रा .वि .व ज .सं . विभाग ,मंत्रालय ,मुंबई.
२९.नियोजन विभाग /वित्त विभाग ,मंत्रालय ,मुंबई.
३०.जल-७, निवड नस्ती